# सरकारी जमिनीवर कोणाचाही अधिकार नाही

## केंद्र सरकारचे सुप्रीम कोर्टात स्पष्टीकरण

**नवी दिल्ली –** वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी पार पडली. वक्फ ही इस्लाममधील अनिवार्य धार्मिक प्रथा नसून ती केवळ एक धर्मादाय संकल्पना आहे. वक्फ बाय यूजरसारख्या वादग्रस्त तरतुदी हटवून केंद्राने वक्फ कायद्यात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत, असा युक्तिवाद केंद्र सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बुधवारी सुप्रीम कोर्टात केला.

सरकारी जमिनीवर कोणालाचाही कोणताही अधिकार असू शकत नाही. कोणतीही जमीन सरकारी असेल, तर ती वक्फ घोषित केली असली तरीही ती परत घेण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे. वक्फ ही एक धर्मनिरपेक्ष व्यवस्था आहे आणि हा कायदा केवळ त्याचे प्रशासन आणि व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणण्यात आली आहे, त्याचा धार्मिक स्वातंत्र्यावर कोणताही परिणाम होणार नाही, असेही त्यांनी सुप्रीम कोर्टाला सांगितले.

मंत्रालयाने विधेयक तयार केले आणि कोणताही विचार न करता मतदान झाले असे हे प्रकरण नाही. काही याचिकाकर्ते संपूर्ण मुस्लिम समुदायाच्यावतीने बोलू शकत नाहीत. तुमच्याकडे आलेल्या याचिका अशा लोकांनी दाखल केल्या आहेत, ज्यांच्यावर या कायद्याचा थेट परिणाम होत नाही. संसदेला हा कायदा करण्याचा अधिकार नाही, असे कोणीही म्हटले नाही. जेपीसीच्या ९६ बैठका झाल्या आणि आम्हाला ९७ लाख लोकांकडून सूचना मिळाल्या, ज्यावर अतिशय विचारपूर्वक काम करण्यात आले, असा युक्तिवादही तुषार मेहता यांनी केला.

**वक्फ बाय यूजर आता केवळ तीन अपवादांमध्येच लागू**

वक्फ बाय यूजर आता केवळ तीन अपवादांमध्येच लागू होईल. पहिले म्हणजे जर ती मालमत्ता नोंदणीकृत असेल. दुसरे, ती खाजगी मालमत्ता असेल आणि तिसरे ती सरकारी मालमत्ता असेल.

# बोगस बियाणे, खत विक्रेत्यांवर कारवाईसाठी भरारी पथक नियुक्त

## कोपरगाव तालुक्यात ५२ हजार हेक्टवर खरीप पेरणीचे उद्दिष्ट

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** कोपरगाव तालुक्यात ५२ हजार ४०० हेक्टरवर खरिपाची पेरणीचे उदीष्ट असून खरीप हंगामासाठी सोयाबीन २४ हजार हेक्टर, मका १८ हजार हेक्टर, उडीद ५० हेक्टर, तूर १०० हेक्टर, बाजरी १ हजार हेक्टर, भुईमुग ३०० हेक्टर तर कापूस १६०० हेक्टर या पिकांचे पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. पेरणीच्या वेळी खत, बियाणांची होणारी साठेबाजी तसेच बोगस बियाणे आणि खतांची विक्री करणारे याकाळात वाढतात. यामुळे कोपरगावचा कृषी विभागही सज्ज झाला असुन बनावट बियाणे, अवैध आणि विनापरवाना खते, जादा दराने खते आणि बियाणांची विक्री करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यासाठी तालुकास्तरीय भरारी पथकांची स्थापना करण्यात आली.



▸ कोपरगाव तालुक्यात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे व खते मिळण्यासाठी कृषी विभाग सज्ज झाला असून शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्याकडूनच बियाणे खते औषधे खरेदी करावी. बनावट खते, बियाणे, औषधे अथवा खते लिंकिग याबद्दल शेतकऱ्यांची काही तक्रार असल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा. कृषी सहायक हे शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे याविषयी माहिती देतील. त्याचप्रमाणे बोगस माल ओळखण्यासाठी मदत करतील. शेतकऱ्यांच्या तक्रारी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे असेल.

**–मनोज सोनवणे**, तालुका कृषी अधिकारी

बोगस माल जप्त करणे आणि संबंधिताविरुद्ध पोलिसांत गुन्हा नोंदविणे किवा न्यायालयात थेट खटला भरण्याचे अधिकार या पथकांना आहेत. दरवर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बनावट रासायनिक बियाणे, खते विक्री होते. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते.

काही परवानाधारक दुकानदार शेतकऱ्यांना अनुदानित रासायनिक खत आणि बियाणे विक्री करण्यासाठी अन्य माल घेण्याची सक्ती करतात. अशा प्रकारे लिंकिंग करून शेतकऱ्यांना लुबाडले जाते. यासाठी तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली एक तालुकास्तरीय भरारी पथक स्थापन केले आहे. पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी सचिन कोष्टी हे या पथकाचे सचिव आहेत.

तालुकास्तरीय भरारी पथकात सात अधिकारी आहेत. यात तालुका कृषी अधिकारी हे पथक प्रमुख असतील. पंचायत समितीचे कृषी अधिकारी सदस्य सचिव आहेत. चार मंडल कृषी अधिकारी आणि तसेच वैधमापन शास्त्र विभागाचे निरीक्षक हे सदस्य आहेत.

# एकजूट तुटली की शत्रू लचके तोडायला मोकळे असतात- उद्धव ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)–** भूमिपुत्रांवर अन्याय होऊ न देणे किंवा त्यांच्यावर अन्याय होत असेल तर त्याला मोडून टाकण्यासाठी शिवसेनेची स्थापना झाली आहे. शिवसेना ही नेहमीच कामगारांच्या पाठीशी उभी राहिली असून सर्वांनी एकजुटीने एकत्र राहावे. पण एकजूट तूटली तर लचके तोडायला आपले शत्रू मोकळे असतात, अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी विरोधकांवर निशाणा साधला.

पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानला मदत करणाऱ्या तुर्कीच्या कंपन्यांवर बंदी घातली आहे.

# बच्चू कडूंनी घेतली बीजमाता राहीबाई पोपेरेंची भेट

**अकोले (प्रतिनिधी)–** प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी कोंभाळणे गुरुवारी (दि.२२) येथे जाऊन पद्मश्री बीजमाता राहीबाई सोमा पोपेरे यांची भेट घेतली. अनेक दिवसांपासून राहीबाई यांना भेटण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. आज त्यांनी प्रत्यक्ष पूर्ण केली.

पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी आमदार बच्चू कडू यांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. गावरान बियाण्यांचा संग्रह व बीजबँक



प्रकल्प यांची सविस्तर माहिती त्यांनी घेतली. बायफ या आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त संस्थेच्या मदतीने देशातील पहिली गावरान बियाणे बँक उभारली होती. नामशेष होत चाललेले ५२ पिकांचे ११४ वाण त्यांनी गावातील महिला शेतकऱ्यांच्या मदतीने जतन केलेले आहेत. याप्रसंगी या सर्व बियाण्यांचे तसेच औषधी वनस्पतींचे प्रदर्शन त्यांनी भरवले होते. राहीबाई यांच्याशी अत्यंत मनमोकळ्या गप्पा त्यांनी केल्या. बीज संवर्धनाचे कार्य करताना येणाऱ्या अडचणी त्यांनी समजून घेतल्या. कोंभाळणे हे डोंगरावर वसलेले गाव असल्याने पाण्याची गंभीर समस्या येथे निर्माण होते. शेती व दैनंदिन वापरासाठी पाण्याची गंभीर समस्या असल्याचे त्यांनी कडू यांच्या लक्षात आणून दिले. शेतकऱ्यांसाठी गावरान बियाणे मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यासाठी प्रहार संघटनेकडून व शासनाकडे पाठपुरावा करून पाणी समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी मदत केली जाईल असे आश्वासन दिले. भेटी दरम्यान अनेक पारंपरिक आणि नष्ट होत चाललेल्या संस्कृतीबद्दल सुद्धा प्रदीर्घ चर्चा केली.

# मुख्य पुरुष सदस्य अद्याप फरार कसा काय?- सुळे

**पुणे (प्रतिनिधी)–** आठ महिन्यांच्या तान्ह्या बाळाला सोडून कोणतीही आई आत्महत्या करणार नाही. वैष्णवीच्या शरीरावर मारहाणीच्या गंभीर खुणा आढळल्या आहेत, ज्यामुळे ही आत्महत्या नाही तर हा खूनच आहे असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी २४ वर्षीय वैष्णवी हगवणे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी केला आहे. या कुटुंबातील मुख्य पुरुष सदस्य अद्याप फरार कसा काय? पुरोगामी महाराष्ट्रात एका २४ वर्षीय मुलीला न्याय मिळालाच पाहिजे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

मुळशी तालुक्यातील २४ वर्षीय वैष्णवी हगवणे हिच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अवघ्या आठ महिन्यांच्या बाळाची आई असलेल्या वैष्णवीचा मृत्यू आत्महत्या आहे की घातपात, यावर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घटनेला पाच दिवस उलटूनही वैष्णवीचा पती राजेंद्र हगवणे अद्याप फरार असल्याने, या प्रकरणाला अधिक गूढ वळण लागले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत, वैष्णवीच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## पान १ वरुन

### यंदा शिबीरं घेऊन पीक कर्ज द्या

अधिकारी गायत्री साळुंके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी बँकांना उद्दिष्ट ठरवून देण्यात येते. दिलेले उद्दिष्ट विहित वेळेत पूर्ण करुन प्रत्येक गरजू व पात्र शेतकऱ्याला पीककर्ज मिळावे यासाठी कृषी विभाग, ग्रामसेवक तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या सहकार्यातून बँकांनी ग्रामीण पातळीवर कॅम्पचे आयोजन करावे. पीककर्जासाठी आवश्यक असणारी कागदपत्रांची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून करुन घेण्यात यावी. क्षुल्लक कारणांवरून कर्जाचे प्रस्ताव नाकारण्यात येऊ नयेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कर्जांची प्रकरणे बँकांकडे संबंधित विभागामार्फत पाठविण्यात येतात. अशी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याच्या प्रक्रियेमध्ये विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बँकांमध्ये प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत. ग्राहकांनी बँकांकडे केलेल्या तक्रारींचा निपटारा वेळेत करुन त्याची माहिती सादर करण्यात यावी. ई- पींक रिक्षासाठी मंजूर लाभार्थ्यांना तातडीने निधीचे वितरण करावे. जिल्ह्यातील उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळाच्या मागणीनुसार आरसेटीमार्फत प्रशिक्षण घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

यावेळी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सीएमईजीपी, पीएमईजीपी, एमएसआरएलएम, पी. एम विश्वकर्मा यासह ईतर विभागामार्फत कर्ज पुरवठ्यासाठी दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच यावेळी जिल्हा पत आराखडा २०२५ चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

### पीक नुकसानीच्या पंचनाम्याचे निर्देश

नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास राज्य सरकार नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेती पीक नुकसानीपोटी सन २०२३- ०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी रुपये तर १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी रुपये तर १ एप्रिल २०२५ ते २१ मे २०२५ या कालावधीत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती जाधव-पाटील यांनी यावेळी दिली.

### ब्राम्हणवाड्याचे जवान...

लष्करातील सेवा काळात त्यांनी अनेक दुर्गम आणि अत्यंत कठीण परिस्थितीत देशसेवा बजावली. ते अत्यंत शिस्तप्रिय, समर्पित आणि राष्ट्रभक्त जवान म्हणून परिचित होते. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये त्यांचा विशेष सन्मान होता.

**कुटुंबावर दुःखाचा डोंगर :**

संदीप गायकर यांचे वय ३२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दीड वर्षांचा मुलगा, वडील पांडुरंग गायकर, आई, आणि दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या अकाली जाण्यामुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील प्रत्येकजण या दुःखात सहभागी आहे.

**गावात दुखवटा आणि बंदची घोषणा :**

त्यांच्या निधनामुळे ब्राम्हणवाडा गावात २३ ते २७ मे पर्यंत (पाच दिवस) दुखवटा पाळण्यात येणार आहे. या काळात गावातील सांस्कृतिक कार्यक्रम, लाऊडस्पीकर, मिरवणुका यावर बंदी घालण्यात आली आहे.

तसेच, २३ आणि २४ मे रोजी गावातील सर्व दुकाने (अत्यावश्यक सेवा वगळता) बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**अंत्यविधीची माहिती :**

संदीप गायकर यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन २४ मे रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या राहत्या घरी आनंददरा, ब्राम्हणवाडा येथे त्यांच्या कुटुंबियांसाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या पार्थिवाची ग्रामप्रदक्षिणा होणार असून सकाळी १० वाजता सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा मैदानावर त्यांच्या शासकीय इतमामात अंत्यविधीचा कार्यक्रम होईल.

**गावाच्या आणि राष्ट्राच्यावतीने श्रद्धांजली :**

ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा, सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, सर्व सदस्य, ग्रामस्थ, व्यापारी संघटना आणि संपूर्ण अकोले तालुक्याच्या वतीने वीर जवान संदीप गायकर यांना अत्यंत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. त्यांच्या शौर्याचा इतिहास गावाच्या आणि देशाच्या स्मरणात सदैव जिवंत राहील.

### सामोपचार कर्ज परतफेडीला मुदतवाढ

त्याचा परिणाम नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेवी कमी होण्यामध्ये व काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ठेवी काढण्यात येत असल्याने काही पतसंस्था अडचणीत आल्या आहेत. त्यामुळे सामोपचार परतफेड योजनेस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### विश्रामगृहात कोट्यवधींची रोकड

इतिहासात प्रथमच शासकीय विश्रामगृहात इतकी मोठी रक्कम सापडली आहे. यामागे कोणाचा हात आहे, हे स्पष्ट व्हायला हवं. त्यांनी सांगितले की, याबाबत पोलिस अधीक्षकांना माहिती दिल्यावर त्यांनी १० मिनिटांत येतो असं सांगितलं, पण ते १० तास उलटून गेले तरी पोहोचलेच नाहीत.

गोटे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, गृहसचिव तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट फोन केल्याचे सांगितले. आठ वर्षांत पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांना फोन केला, पण त्यांनी तो उचललाच नाही. त्यांच्या सचिवाने फोन घेतला आणि १० मिनिटांत फोन लावतो असं सांगितलं, पण आतापर्यंत फोन आलेला नाही, असे गोटे म्हणाले.

माझा पोलिस, सीआयडी, अँटी करप्शन यंत्रणांवर विश्वास नाही. तुकाराम मुंडे किंवा प्रविण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली आयएएस,आयपीएस अधिकाऱ्यांची समिती नेमावी. अर्जुन खोतकरच मुख्य संशयित असतील, तर त्यांनीच चौकशीची मागणी करावी एवढी हिंमत दाखवावी, असं खुले आव्हान गोटेंनी दिलं. त्यांनी असा दावाही केला की, १०२ क्रमांकाच्या खोलीत पाच कोटी रुपये होते, पण काही रक्कम लंपास झाली. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी त्यांनी केली आहे.

### मनपाची पिशवी, गायब झालेले लाखो रुपये

**गोटेंनी म्हटले की, मनपा आयुक्तांनी ऐंशी लाख रुपयांची एक पिशवी समितीला दिली होती. परंतु नंतर त्या पिशवीत केवळ ५८ लाखच सापडले. या पिशवीवर एम लिहिलेलं होतं, म्हणजेच ती मनपाची असल्याचे स्पष्ट संकेत आहे.**

### रक्कम ट्रेझरीत, चौकशी प्रगतिपथावर

धुळे शहरातील गुलमोहर शासकीय विश्राम गृहातील खोलीत काल आढळून आलेली १ कोटी ८४ लाखांची रोकड ट्रेझरीमध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहे. या रोकड संबंधीतबाबी तपासण्यासाठी एडिशनल डायरेक्टर इनकम टॅक्स (तपास), नाशिक यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. तसेच बीएनएस कायदा कलम १७३ (३) प्रमाणे चौकशी सुरू सुरू करण्यात आली असून प्रकरणाच्या चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे. चौकशीत काय स्पष्ट होते, त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

### अनिल गोटेंचा खोतकरांना थेट सवाल

माझ्या आरोपात तथ्य नसेल तर मला अटक करा गोटे म्हणाले, खोतकर यांचा पीए १५ मेपासून विश्रामगृहात होता. त्या रोकडचा नेमका मालक कोण? सरकार तुमचं आहे, मी खोटं बोलत असेल तर मला अटक करा, अशी तयारी आहे.

### धुळे प्रकरणाची एसआयटी चौकशी-मुख्यमंत्री

शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेखालील विधिमंडळाची अंदाज समिती काल, बुधवारी धुळ्याच्या दौऱ्यावर होती. या दौऱ्याच्या दरम्यान खोतकर यांच्या स्वीय सहाय्यकाच्या खोलीत कोट्यवधीची रक्कम आढळून आली. या प्रकरणाने मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर काल प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एसआयटी चौकशीची घोषणा केली.

या प्रकरणात कोण दोषी आहे, कोणी पैसे मागितले का याचा छडा लावण्यात येईल. याशिवाय विधानसभेचे अध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती यांना देखील विनंती करून त्यांनी स्वतंत्रपणे एथिक्स समिती नेमून चौकशी करावी. विधानमंडळ समितीची बदनामी होणे परवडणारे नाही. त्यामुळे या प्रकरणात गांभीर्यांने कारवाई केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणी मी स्वत: पिंपरी-चिंचवडच्या पोलीस आयुक्तांना हस्तक्षेप करण्यास सांगितले आहे. वैष्णवी हगवणेचे बाळ आता तिच्या वडिलांकडे पोहोचलेले आहे. वैष्णवीचे प्रकरण हे अतिशय दुर्देवी असून ते मानवतेला काळिमा फासणारे आहे. त्यामुळे या प्रकरणाची योग्यरितीने चौकशी करण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले. वैष्णवीच्या अंगावर ज्या प्रकारे मारहाणीचे वळ होते, तिच्या ऑडिओ क्लिप्स तसेच वैष्णवीच्या घरच्यांनी दिलेली माहिती या आधारावर ही चौकशी होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**कक्ष अधिकारी किशोर पाटील निलंबित**

दरम्यान, धुळे विश्रामगृहातील धक्कादायक घटनेची विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात अंदाज समिती दौऱ्यावर असताना विधिमंडळचे संशयित कक्ष अधिकारी किशोर पाटील यांना निलंबित करण्याचा निर्णय शिंदे यांनी घेतला आहे. याशिवाय या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येणार असल्याची घोषणा शिंदे यांनी केली आहे.

### द्वारकामाईत आढळले चक्क सोन्याचे घड्याळ!

करून पाहिले असता त्याचे वजन २२ ग्रॅम निघाले. जे सध्याच्या बाजारभावानुसार सुमारे २ लाख रुपये होते. या घड्याळाच्या डायलवर ब्रिटनच्या महाराणी व्हिक्टोरियांची प्रतिमा होती. जे याला अधिक ऐतिहासिक आणि मौल्यवान बनवते. त्याचप्रमाणे या दोन्हीही साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांची ही कामाप्रती असलेली प्रामाणिकता, करोडो भक्तांची बाबाप्रती असलेली भक्ती अधिक मजबूत करते.

साईबाबा संस्थानचे हे दोन्ही कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि कुठलाही मोह न ठेवता घड्याळ संरक्षण कार्यालयात जमा केले. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### १० वी-१२ वीच्या पुरवणी...

जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) ची लेखी परीक्षा २४ जून २०२५ ते १६ जुलै २०२५ या कालावधीत होणार आहे. तर, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा २४ जून ते ११ जुलै २०२५ दरम्यान घेण्यात येतील.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी)ची लेखी परीक्षा २४ जून २०२४ पासून सुरू होऊन ८ जुलै २०२५ पर्यंत चालणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा २४ जून ते ८ जुलै २०२५ या काळात होतील.

इयत्ता १० वीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २४ जून ते ४ जुलै २०२५ या दरम्यान घेण्यात येणार आहे. तसेच इयत्ता १२ वी माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने दिनांक १५ जुलै २०२५ व १६ जुलै २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.

मंडळाच्या अधिकृत वेबसाइट www.mahahsscboard.inवर दिनांक २२ मे २०२५ पासून हे वेळापत्रक उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाने स्पष्ट केले आहे की, वेबसाइटवर प्रसिद्ध झालेले वेळापत्रक हे अंतिम असेल आणि शाळा तथा कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर वेळापत्रक डाउनलोड करून परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावणे बंधनकारक आहे. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले किंवा प्रसिद्ध झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असे आवाहन मंडळाने केले आहे. या वेळापत्रकाची प्रत संबंधित विभागीय मंडळे, तसेच शिक्षण विभागाच्या विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत वेबसाइटवरील माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन मंडळाने केले आहे.

### सोमनाथ घार्गे नवे एसपी

दोन समाजाच्या गटांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. त्यावर देखील त्यांनी मात करून कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. अधीक्षक ओला यांना १३ वर्षांच्या सेवेनंतर भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता आणि नेतृत्वगुण अधिक दृढ झाले. ओला यांचा कार्यकाळ जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरला आहे.

### १२ वाळू साठ्यांचा ९ जूनला ई-लिलाव

नव्याने महसूलमंत्री पदाची सूत्रे हाती घेतलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारित वाळू धोरण जाहीर केले. राज्य पातळीवरून वाळू धोरण निश्चित झाल्यानंतर जिल्ह्यात पहिल्यांदा वाळू साठ्यांचा ऑनलाईन पद्धतीने लिहिला होणार आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने वेळापत्रक तयार करण्यात आले असून यात १९ मे पासून जिल्ह्यातील वाळू साठ्यांच्या लिलावासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रसिद्ध होणाऱ्या निवेदनुसार संबंधितांना दोन जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने लिलावात सहभागी होण्यासाठी नोंदणी करता येणार आहे. नोंदणी केल्यानंतर संबंधित व्यक्ती अथवा संस्था यांना वाळू साठ्याच्या लिलाव रकमेच्या २५ टक्के इसारा जिल्हा गौणखनिज विभागाकडे जमा करण्याची बंधनकारक ठेवण्यात आले आहे. याच काळात संबंधित व्यक्ती अथवा संस्थेला वाळू लिलाव ठेका घेण्यासाठी तांत्रिक लिफाफा सादर करावा लागणार आहे. आज २३ मे रोजी जिल्हा पातळीवरती वाळूसाठा लिलाव पूर्व बैठक होणार असून या बैठकीत वाळू साठ्याच्या लिलावाची तयारी करण्यात येणार आहे. त्यानंतर चार ते सहा जून या कालावधीत वाळू साठा लिलाव घेण्यासाठी दाखल ऑनलाइन निविदा जाहीर करण्यात येणार आहे. यात पात्र ठरणाऱ्या ई-निविदांची छाननी करण्यात येणार आहे. ही छाननी पूर्ण झाल्यानंतर पात्र निविदाधारकांची ९ जून रोजी ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या वाळूसाठा ई-लिलावात सहभागी होता येणार असल्याचे जिल्हा गौण खनिज विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

**या ठिकाणाच्या वाळूचा होणार लिलाव**

कर्जत प्रांत कार्यालयातंर्गत कर्जत तालुक्यातील नागलवाडी, श्रीगोंदा- पारनेर प्रांत कार्यालयातंर्गत पारनेर तालुक्यातील तास (दोन ठिकाणी), पळशी, नागापूरवाडी, मांडवे खु., पळशी देसवंडे गावाच्या हद्दीत क्रमांक १ ते ४ या ठिकाणी तर श्रीरामपूर प्रांताधिकारी यांच्या अंतर्गत राहुरी तालुक्यातील जातप क्रमांक २ आणि देसवंडी या ठिकाणी अशा १२ ठिकाणच्या वाळूचा लिलाव प्रशासनाच्यावतीने करण्यात येणार आहे.

**लिलावात संगमत करणाऱ्यांवर होणार कारवाई**

जिल्ह्यात होणाऱ्या वाळू लिलावात निविदा भरून सहभागी होणाऱ्या संबंधीतांनी संगमत करून शासनाचा महसूल बुडवण्यास प्रयत्न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. प्रशासनाकडून वाढीव बोली लावण्यानंतर एकादा लिलावात सहभागी होवून दुसऱ्यांदा बोली न लावणाऱ्यांना राज्यभरात काळ्या यादीत टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती**

शासकीय लिलावात सहभागी होणाऱ्या ठेकेदार यांना लिलावा झाल्यानंतर शासनाच्या घरकुल योजनेसाठी ठरवून दिलेली वाळू उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती तैनात राहणार राहणार असल्याचे गौणखनिज विभागाकडून सांगण्यात आले.

### राहुरी, राहाता, संगमनेरमधील...

(रा. कोल्हार भगवती, ता. राहाता), दत्तात्रय विठ्ठल वाणी (रा. झरेकाळी, ता. संगमनेर) अशी अटकेतील संशयित आरोपींची नावे आहेत. संशयित आरोपींनी ९ एप्रिल २०१८ ते १७ सप्टेंबर २०१९ या कालावधीत जिल्हा सहकारी बँकेच्या सोनगाव शाखेत बनावट सोने ठेवून कर्ज घेत बँकेची तब्बल एक कोटी ७१ लाख ३३ हजार ४०० रूपयांची फसवणूक केली होती. या प्रकरणी प्रवीणकुमार पाराजी पवार (रा. लोणी- सोनगाव रस्ता, राहुरी) यांनी १९ डिसेंबर २०२० रोजी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. १०७ संशयित आरोपींविरोधात हा गुन्हा दाखल असून या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यापासून संशयित आरोपी पसार होते. पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक आठरे यांच्या पथकाने संशयित आठ जणांना ताब्यात घेत अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून इतर संशयित आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.